# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

जा.क्र. मनपा/ सा.प्र. /316 /2024-25 दि. 12 /02/2025

## आदेश

**बुधवार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज** यांच्या जयंतीनिमित्त घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पुतळयास सकाळी ९.०० वाजता व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळयास सकाळी ९.३० वा. तदनंतर सकाळी ९.४५ वा. महानगरपालिका मुख्य कार्यालयासमोर प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळयांस पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम **मा.संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) आयुक्त तथा प्रशासक** यांच्या शुभहस्ते आयोजित केला आहे.

तसेच महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे सकाळी ठिक १०.०० वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मा. संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से) आयुक्त तथा प्रशासक यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तरी सदर कार्यक्रमांकरीता खालील अधिकाऱ्यांचे निर्देशानुसार नेमुन दिलेल्या ठिकाणी उपस्थित राहुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती कार्यक्रमांचे कामकाज सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचारी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक खांबीत<br>शहर अभियंता (स्थापत्य.) | • छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मुख्य कार्यालयाच्या इमारतीस रोषणाई करण्याची व्यवस्था, प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळयाची रंगरंगोटी करुन परिसरात सुशोभिकरण करणे.<br>• काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा व एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पूर्णाकृती पुतळा तसेच मुख्य कार्यालय येथील छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयांजवळ रोषणाई करण्यात यावी.<br>• काशिमिरा येथील छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ एल ई डी स्क्रीनची व्यवस्था करावी.<br>• राज्यगीताचे वादन करण्याकरिता मनपा मुख्य कार्यालय दुसरा मजला येथे साउंड सिस्टमची व्यवस्था करावी. |
| २. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी | • काशिमिरा व घोडबंदर रोड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांचे अश्वारुढ पूर्णाकृती पुतळे आपल्या विभागामार्फत स्वच्छ धुवून घेण्यात यावेत. तसेच सदरचा परिसरही धुवून |

| | | |
|---|---|---|
| | | घेण्यात यावा.<br>• अग्निशमन विभागाची हायड्रोलीक शीडी त्यांच्या चालकासह नमुद ठिकाणी न चुकता तयार ठेवावी. याबाबत संबंधित विभागाच्या अधिनस्त अधिका-यांना आदेश देवून कार्यवाही करावी. नियोजित कार्यक्रमामध्ये बाधा येणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ३. | श्री. हंसराज मेश्राम<br>प्र.उपमुख्य उदयान अधिक्षक, भाईंदर (प.) | • एम.टी.एन.एल. भाईंदर (प.) येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळा आणि आणि मुख्य कार्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अर्धकृती पुतळे धुवून साफ करावेत. तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करावी.<br>• एम.टी.एन.एल. समोर भाईंदर (प.) येथे सकाळी 09.15 वाजता तीन मोठे पुष्पहार, तीन श्रीफळ घेऊन नचुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ४. | श्री. नागेश विरकर<br>प्र.उपमुख्य उदयान अधिक्षक, मिरा रोड | काशिमिरा व घोडबंदर रोड येथील अश्वारुढ पूर्णाकृती पुतळ्या करीता सकाळी 08.45 वाजता तीन मोठे पुष्पहार, तीन श्रीफळ घेऊन न चुकता उपस्थित रहावे. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| ५. | श्रीम. दिपाली पवार<br>सहा. आयुक्त, शिक्षण विभाग | राज्यगीत गायन व छोटेखानी सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करणेकरिता शिक्षक व विदयार्थाची नेमणुक करण्यात यावी. सदर कार्यक्रमा करीता मि.भा.मनपा मुख्य कार्यालयात न चुकता वेळेवर हजर रहावे. |
| ६. | श्री. राजकुमार घरत<br>जनसंपर्क अधिकारी | फोटोग्राफी करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध करणे व सदर कार्यक्रमाचे परिपत्रक मा. संपादक, पत्रकार,इ ना वाटप करण्याचे काम आपल्या विभागाकडून करण्यात यावे. तसेच परिपत्रक महानगरपालिकेच्या वेबसाईट तसेच नोटीस बोर्डावर प्रसिध्दी देणे. |
| ७. | श्री. सुनिल यादव,<br>सहा. आयुक्त, आस्थापना विभाग | सुरक्षिततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना उपस्थित राहणे करीता आदेशित करावे. |

वरील प्रमाणे नमुद अधिकाऱ्यांनी सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी.

Signed by
Kalpita Kishor Pimple
Date: 11-02-2025 18:18:43

**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**